RAISONI GROUP
a vision beyond

# G.H.Raisoni Institute of Engineering & Management,Jalgaon

पुण्य नगरी

Date 18 January 2017

## रायसोनीतर्फे शिक्षकांसाठी 'टीचर इन यू' शिबिराचे आयोजन

जळगाव : शिक्षकांची समाजाप्रती भूमिका व जबाबदारी मोठी आहे. शिक्षक स्वतः अनेक पिढ्यांचे भविष्य घडवितो. त्याला आकार देतो, त्यामुळे शिक्षक समाज व्यवस्थेचे महत्त्वपूर्ण अंग आहे. फक्त परीक्षा घेऊन गुणांच्या आधारावर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यात येते. पण विद्यार्थ्यांनाचा व्यक्तिमत्व विकास करताना त्याला जीवनात येणाऱ्या अडचणींवर मात करायला शिकविणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. हा दृष्टिकोन शिक्षकांना अवगत व्हावा म्हणून जी.एच.रायसोनी करिअर फाउंडेशन व ग्लोबल एज्यूकेशन लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'टीचर इन यू' या शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

संपूर्ण जिल्ह्यातील शहरी तसेच ग्रामीण भागातील जिल्हा परिषद व महापालिकेच्या शाळेतील शिक्षक आणि इतर अन्य शिक्षकांनादेखील या शिबिरात सहभागी होता येईल.

३ तास चालणाऱ्या शिबिरात प्रशिक्षणा दरम्यान शिक्षकांना विविध आकलन व मूल्यमापन पद्धतीसंबंधी प्रशिक्षण मिळणार आहे. तसेच प्रभावी संवाद कौशल्य, शिकविण्याच्या विविध पद्धती, विद्यार्थ्यांची मानसिकता कशी ओळखावी, शिक्षकाचे मूलतत्त्व, शिक्षकाचा आत्मविश्वास वाढविणे, सद्य स्थितीमध्ये विषयांचे सखोल ज्ञान, अशा विविध पद्धती या शिबिरात सांगितल्या जाणार आहेत.

शिबिरात कोणत्याही शिक्षकांना सहभाग घेण्यासाठी गणेश पाटील सर यांना संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनशक्ति
www.dainikjanshkti.com Date 18 January 2017

# रायसोनीतर्फे शिक्षकांसाठी 'टीचर इन यु' शिबिर

। जळगाव प्रतिनिधी।

शिक्षकांची समाजाप्रती भूमिका व जबाबदारी मोठी आहे. शिक्षक स्वतः अनेक पिढ्यांचे भविष्य घडवितो. त्याला आकार देतो, त्यामुळे शिक्षक समाज व्यवस्थेचे महत्त्वपूर्ण अंग आहे. फक्त परीक्षा घेऊन गुणांच्या आधारावर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यात येते. पण विद्यार्थ्यांनाचा व्यक्तिमत्व विकास करताना त्याला जीवनात येणाऱ्या अडचणींवर मात करायला शिकविणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे.

G.H.Raisoni Institute of Engineering & Management,Jalgaon

महाराष्ट्र टाइम्स

Date 18 January 2017

# शिक्षकांसाठी 'टिचर इन यू' शिबिर

म. टा. प्रतिनिधी, जळगाव

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास करताना त्याला जीवनात येणाऱ्या अडचणींवर मात करायला शिकवणे, हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. या उद्देशाने जी. एच. रायसोनी करिअर फाउंडेशन व ग्लोबल एज्युकेशन लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'टिचर इन यू' या शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

शिबिरात प्रशिक्षणादरम्यान शिक्षकांना विविध आकलन व मूल्यमापन पद्धतीसंबंधी प्रशिक्षण मिळणार आहे. प्रभावी संवाद कौशल्य, विद्यार्थ्यांची मानसिकता कशी ओळखावी, शिक्षकाचे मूलतत्त्व याची माहिती ६० दिवसांच्या शिबिरात सांगितली जाणार आहे.

Engineering Management Law Schools Other Courses
RAISONI GROUP OF INSTITUTIONS
NAGPUR AMRAVATI AHMEDNAGAR PUNE JALGAON RAIPUR